**संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत.**
**श्री. प्रशांत कैलास खेडेकर, उप जिल्हाधिकारी (निवड श्रेणी)**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन आदेश क्र. संकीर्ण ८२२६/प्र.क्र.१३० (ई.न.१६२९९१७)/सां.का.४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२६.

वाचा :

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही- २०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन १२, दिनांक १७ डिसेंबर २०१६.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्यासन १२, दिनांक १६ फेब्रुवारी २०१८.

३) शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्र. प्रतिनि-०५२६/प्र.क्र.११३/आस्था-२ (ई ऑफिस क्र. १६६५४८७) दिनांक ०४ जून २०२६.

**शासन आदेश :-**

श्री. प्रशांत कैलास खेडेकर, उप जिल्हाधिकारी-निवडश्रेणी, महसूल व वन विभाग यांची सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातील "संचालक" पदावर पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे:-

१. श्री. प्रशांत खेडेकर, उप जिल्हाधिकारी-निवडश्रेणी यांची उक्त पदावरील प्रतिनियुक्ती ते ज्या दिवशी सदर पदावर रुजू होतील त्या दिवसापासून प्रथमतः दोन वर्षाच्या कालावधीसाठी किंवा सदर पदावर नियमित अधिकारी उपलब्ध होईपर्यंत किंवा या विभागाच्या पुढील आदेशापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत असेल. प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर त्यांनी त्यांच्या मूळ विभागामध्ये रुजू होणे आवश्यक राहील.

२. जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन / सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

३. जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही, तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेतर नियोक्त्याने शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे.

४. श्री. प्रशांत खेडेकर, उप जिल्हाधिकारी-निवडश्रेणी यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे, अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

५. श्री. प्रशांत खेडेकर, उप जिल्हाधिकारी-निवडश्रेणी यांना उपरोक्त प्रतिनियुक्तीच्या कालावधीत प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

६. श्री. प्रशांत खेडेकर, उप जिल्हाधिकारी-निवडश्रेणी यांनी प्रतिनियुक्तीचे प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यानंतर प्रतिनियुक्तीच्या कार्यालयात रुजू व्हावे. त्यासाठी त्यांना पदग्रहण अवधी, प्रवास खर्च इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

७. श्री. प्रशांत खेडेकर, उप जिल्हाधिकारी-निवडश्रेणी यांना अनुज्ञेय असलेल्या रजा, गट विमा योजना, वैद्यकीय सवलत, रजा प्रवास सवलत इत्यादी सेवाविषयक बाबींच्या संदर्भात त्यांना त्यांच्या मूळ विभागातील सेवाविषयक नियम लागू राहतील.

८. श्री. प्रशांत खेडेकर, उप जिल्हाधिकारी-निवडश्रेणी यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी महसूल व वन विभागामार्फत हाताळण्यात येतील.

०२. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संगणक संकेतांक २०२६०८१३१६१५०२३७४३ असा आहे. हे आदेश डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BALASAHEB ISHWAR SAWANT

Digitally signed by BALASAHEB ISHWAR SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, 2.5.4.20=79fcecc76dd8693a7bfcec682ee63eee2edaf06ba586ac71715d8e6ba4d62fbe, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=327FE83917B9691D96F2C6AEB03B51A86A595CCAC9264923EA4CD090FFD03E83, cn=BALASAHEB ISHWAR SAWANT
Date: 2026.08.13 17:02:14 +05'30'

**(बाळासाहेब ईश्वर सावंत)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री, नगर विकास, गृहनिर्माण आणि सार्वजनिक बांधकामे (सार्वजनिक उपक्रम वगळता) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवा कल्याण आणि अल्पसंख्यांक व औकाफ यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. श्री. प्रशांत खेडेकर, उप जिल्हाधिकारी-निवडश्रेणी, खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण, मंत्रालय, मुंबई.
८. सह संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, एम.जी. रोड, मुंबई.
९. अवर सचिव (आस्था-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. विशेष कार्य अधिकारी, मा. राज्यमंत्री, उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व अवर सचिव/सर्व कार्यासन अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४.महालेखापाल (लेखा परीक्षा) - १ महाराष्ट्र, मुंबई.
१५.महालेखापाल (लेखा परीक्षा) - २ महाराष्ट्र, नागपूर.
१६.महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) - १ महाराष्ट्र, मुंबई.
१७.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २ महाराष्ट्र, नागपूर.
१८. निवड नस्ती, सां.का.४.